# :: आदेश ::

१. अर्जदारांनी सदरचा अर्ज वारसाचे प्रमाणपत्र मिळणे कामी दाखल केलेला आहे. अर्जदार क्रमांक १ व २ हे मयताचे मुले आहेत. मयत नामे **शेषकला भ्र. बळीराम शिंदे** या **दिनांक १३.०६.२०२२** रोजी लोणगांव ता.माजलगाव जि.बीड येथे मयत झालेल्या आहेत. त्यामुळे मयत **शेषकला भ्र. बळीराम शिंदे** यांच्या पश्चात अर्जदारांशिवाय मयतास इतर कोणीही वारस नाहीत. अर्जदार हे मयताचे संपत्तीचे वारस आहेत.

२. अर्जदारांच्या अर्जातील कथनांनुसार त्यांना खाजगी व शासकीय कामासाठी प्रस्तुत प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. या अर्जासोबत अर्जदारांनी नि.क्र.११ खाली मयताच्या मृत्यू प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत, अर्जदारांच्या आधार कार्डची प्रत दाखल केली आहे.

३. अर्जातील कथनांस व विनंतीस कोणाचा आक्षेप आहे की, नाही हे पडताळून पाहणे कामी अर्जातील मजकूराची जाहीर प्रसिध्दी स्थानिक वृत्तपत्र ''दैनिक टाईम्स'' च्या **दिनांक २३.११.२०२२** च्या आवृत्तीत प्रसिध्द केली गेली. तसेच अर्जातील मजकुराचा जाहीरनामा न्यायालय, तहसील कार्यालय, ग्राम पंचायत कार्यालय येथेही प्रसिध्द करण्यात आला. सदरचे प्रगटन व जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून ते हा आदेश होईपर्यंत कोणत्याही व्यक्तीचा विरोध वा आक्षेप या न्यायालयास प्राप्त झाला नाही. अर्जदार क्रमांक १ आत्माराम पि. बळीराम शिंदे यांची साक्ष नि.७ वर शपथपत्राद्वारे नोंदविण्यात आली आहे. त्यांची साक्ष ही उलट तपासाविना असल्यामुळे अबाधित आहे. शपथपत्रातील केलेले अभिकथन हे

अर्जातील नमूद कथनांस मिळते जुळते आहे. त्यामुळे अर्जातील कथन, तोंडी व कागदोपत्री पुरावा, इत्यादीचा विचार करता हे सिध्द होते की, अर्जदार हेच मयत **शेषकला भ्र. बळीराम शिंदे** यांच्या पश्चात कायदेशीर वारस आहेत. त्यांच्या शिवाय इतर कोणीही वारस नाहीत म्हणून सदर पुरावा ग्राह्य धरणे योग्य होईल. करीता खालील प्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

# आदेश

१. अर्जदारांचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र.१ **आत्माराम पि. बळीराम शिंदे व** अर्जदार क्रमांक २ **बाबासाहेब पि. बळीराम शिंदे** हेच मयत **शेषकला भ्र. बळीराम शिंदे** यांचे कायदेशीर वारस असलेबाबतचे वारसाचे प्रमाणपत्र त्यांच्याकडुन योग्य तो मुद्रांक शुल्क घेवून त्यांच्या नावे देण्यात यावे.

स्वाक्षरीत/-
(एम.एस.बुधवंत)
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर
माजलगांव.

माजलगांव
दिनांक २०.०१.२०२३.

| | |
|---|---|
| Dictated on | : 20-01-2023 |
| Transcribed on | : 20-01-2023 |
| checked on | : 20-01-2023 |
| Signed on | : 20-01-2023 |

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment/order.

| | |
|---|---|
| Name of Steno | : S.M.Sakhare |
| Name of Court | : Jt.C.J.S.D. Court, Majalgaon. |
| Uploaded on | : 21-01-2023 |

Sd/-
Stenographer (Grade-I) Majalgaon.